लोकमत

# अतिरिक्त शालेय गुणांकनासाठी काणेबुवा प्रतिष्ठानला मान्यता

## मंजुषा पाटील : विद्यार्थ्यांच्या कलागुणांना मिळणार वाव

लोकमत न्यूज नेटवर्क

**सांगली :** विद्यार्थ्यांच्या कलागुणांना वाव देण्यासाठी दहावीच्या विद्यार्थ्यांना त्यांच्या कलाशिक्षणासाठी अतिरिक्त गुणांकन दिले जाणार आहे. राज्य शासनाने यासाठी राज्यातील काही संस्थांची निवड केली असून, त्यात संगीताचार्य द. वि. काणेबुवा प्रतिष्ठानचा समावेश झाला आहे, अशी माहिती प्रतिष्ठानच्या सचिव व प्रसिद्ध शास्त्रीय गायिका मंजुषा पाटील यांनी दिली.

संगीत कलेची गोडी असलेल्या विद्यार्थ्यांना आता दहावीतही आनंदाने अभ्यास करता येणार आहे. दहावीच्या परीक्षेला बसणाऱ्या विद्यार्थ्यांना कला आणि क्रीडा यातील प्रावीण्यासाठी अतिरिक्त पाच गुण दिले जातात. क्रीडा प्रकारामध्ये हे प्रमाण भरपूर असले तरी, कला क्षेत्रात गुण मिळविण्यासाठी विद्यार्थी मागे असायचे.

### संगीताचा प्रचार व प्रसार

काणेबुवा प्रतिष्ठानमार्फत सांगली येथे २०१४ पासून गुरुकुल संगीत विद्यालय चालविले जाते. शास्त्रीय संगीताची रीतसर तालीम मुलांना दिली जाते. शालेय मुलांमध्ये संगीताचा प्रचार आणि प्रसार वाढावा म्हणून 'गुरुकुल' प्रयत्नशील आहे, असे पाटील यांनी सांगितले.

अशा मान्यताप्राप्त संस्थांची मर्यादित संख्या आणि प्रमाणपत्र मिळविण्याची किचकट पद्धत यामुळे हे गुण मिळविणे अवघड होते. या प्रश्नाचा विचार करुन शासनातर्फे अशा मान्यताप्राप्त संस्थांमध्ये वाढ करण्यात आली.

पुण्यातील सात संस्थांमध्ये संगीताचार्य द. वि. काणेबुवा प्रतिष्ठानचा समावेश झाला आहे. या संस्थेतून कलेचे प्रमाणपत्र मिळविल्यास दहावीचे विद्यार्थी अतिरिक्त गुणांसाठी पात्र समजले जातील.

संगीताचार्य द. वि. काणेबुवा प्रतिष्ठान या संस्थेला आता राज्य सरकारची मान्यता मिळाल्याने येथे शिकणाऱ्या विद्यार्थ्यांना अतिरिक्त गुण मिळविणे सोपे होईल. गुरुकुलतर्फे शालेय विद्यार्थ्यांसाठी संगीताचा सोपा आणि वेगळा अभ्यासक्रम तयार करण्यात आला आहे.

अधिकाधिक विद्यार्थी याचा लाभ घेऊ शकतील. त्यासाठी शाळांमध्ये प्रचार आणि प्रसाराचे काम संस्था सुरु करीत आहे आणि अधिकाधिक शाळांनी देखील संपर्क साधावा, असे आवाहन मंजुषा पाटील यांनी केले आहे.